# नाव : सौ. शकुंतला ताराचंद कुंभलकर, वनपवनी

नमस्कार, मी सौ. शकुंतला ताराचंद कुंभलकर, मु. वनपवनी, पवनी ग्राम पंचायत, त. रामटेक, जिल्हा नागपूर येथील रहिवासी आहे. माझे वय ४९ वर्ष आहे तसेच माझे पती ५५ वर्षाचे आहेत. मला १ मुलगा आणी १ मुलगी आहेत ते दोघेही लग्नाच्या वयाचे आहेत. मी आई असल्यामुळे मला असे वाटते की घरात शौचालय असावे परंतु परिस्थिती नाजुक असल्यामुळे आमची शौचालय बनविण्याची इच्छा असुनही शौचालय बांधण्याकरीता १२००० ते १५००० रूपये



जुळवायचे कसे हा विचार होता. अशाच वेळेस एकदा गावांत दवंडी झाली की आपल्या गावांत ग्रामसभा आहे आणि त्या सभेत शौचालय १०० टक्के अनुदानावर बनवुण मिळणार आहेत असे माहित झाले. तेव्हा मी ग्रामसभा स्थळी ठरवलेले दिवसी पोहोचले सभेला नागेश्वरा चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव श्रीमान मूर्ति सर मार्गदर्शन करीत होते आणि त्यांनी सांगितलेली संपूर्ण माहिती ऐकुन घेतली. केअर टूडे फंड (इंडिया टूडे) च्या सहाय्याने आणि नागेश्वरा चॅरिटेबल च्या मार्गदर्शनाखाली शौचालय बनवुन मिळणार आहे. असं ऐकुन मला खूप आनंद झाला कारण ज्या घरी मुलगी लग्नाच्या वयाची असते त्या घरी तीच्या आईला अत्यंत काळजी वाटते कारण मी ज्या गावात वास्तव्य करते इथे गावालगत स्त्रिया दिवसाला शौचालय करीता जात नाही. त्यामुळे पोटाचा त्रास वाढतो आणि जंगलात जाणे म्हणजे जनावरांची भिती या सर्व बाबी स्त्रियांनाच लागु

होतात. संस्थेने सांगितल्याप्रमाणे आम्ही आमचे नावं ग्राम पंचायत मध्ये शौचालयाच्या मागणी करीता नोंदवले. त्याप्रमाणे आमच्या घरी जागेचे निरिक्षण करून शौचालयाचा नकाशा जागेवर आखण्यात आला आणि लगेच २ दिवसात आमच्या घरा समोर सर्व साहित्य आले. दुसऱ्या दिवशी पासुन कामाला सुरूवात झाली. एका आठवडयात शौचालयचे काम पूर्ण झाले आम्ही त्यावर १५ दिवस पर्यंत पाणी नियमितपणे टाकले. त्यावर सफेदी करून नाव टाकुन पूर्ण करण्यात आले. तसेच संस्थेकडुन आम्हाला वापर करण्याबाबत माहिती देण्यात आली व आम्ही परिवारांचे सर्व सदस्य शौचालयाचा वापर करण्यास सुरूवात केली. आमच्या घरात शौचालय झाल्यामुळे परिवारात होणारा आरोग्यावर खर्च कमी झाला आणि वेळेची बचत झाली. वाचलेला वेळ आम्ही आमच्या कुंटुंबाच्या समृध्दीकरीता करून आमचे उत्पन्न वाढविण्यात मदत झाली.

मी धन्यवाद देते कि नागेश्वरा चॅरिटेबल ट्रस्टच्या मदतीने आमच्या गावात केअर टूडे च्या आर्थिक सहाय्याने शौचालय बनवुन मिळाले. आम्ही अश्या या केअर टूडे तसेच नागेश्वरा चॅरिटेबल ट्रस्ट तसेच संस्थेचे मार्गदर्शक सर्वांना शत शत प्रणाम.